# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / ५३ /२०२५-२६ दि: १५ /०९/२०२५

## आदेश

**विषय**:- "माहिती प्रसिध्दी" समिती गठीत करणेबाबत.

महानगरपालिका अंतर्गत विभागांमार्फत राबवित असलेल्या विविध योजना, उपक्रम, प्रकल्प, अभियान, पुरवित असलेल्या सेवा-सुविधा याबाबत शहरातील नागरिकांना, समाज माध्यमांना अवगत करणेकरीता प्रसिध्दी दिली जाते. सदरची प्रसिध्दी देत असताना देण्यात येणारी माहिती परिपूर्ण, त्रुटीमुक्त आणि कामाचा स्पष्ट बोध होणे अभिप्रेत आहे. तसे न झाल्यास नागरिक व समाज माध्यमांमध्ये संभ्रम किंवा गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते.

सबब, महापालिकेचे विविध उपक्रम, योजना, प्रकल्प, अभियान, सेवा-सुविधा याबाबतची माहिती प्रसिध्द करण्यापूर्वी त्याबाबतचा मसुदा तपासणेसाठी महापालिका अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्याचे विचाराधीन होते.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | संबंधित विभागाचे अतिरिक्त आयुक्त | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागाचे उप-आयुक्त | सह अध्यक्ष |
| ३. | मुख्य लेखा अधिकारी | सदस्य |
| ४. | शहर अभियंता | सदस्य |
| ५. | विधी अधिकारी | सदस्य |
| ६. | सिस्टीम मॅनेजर | सदस्य |
| ७. | प्रकल्प प्रमुख, नाविन्यता कक्ष | सदस्य |

उपरोक्त समितीने प्रसिध्द करावयाच्या माहितीचा मसुदा तपासून (Proof Reading) परिपूर्ण व त्रुटीमुक्त माहिती प्रसिध्द होईल, याची सर्वतोपरी खबरदारी घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा**, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

सर्व संबधित समिती अध्यक्ष/सचिव/सदस्य